स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त अभिवादन ग्रंथ

# सर्वदर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर


संपादक

**डॉ. पी. विठ्ठल**
समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
अध्यासन व अभ्यास केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**डॉ. नागोराव कुंभार**
माजी अधिष्ठाता,
सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड



डायमंड पब्लिकेशन्स

**सर्वदर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
संपादक : डॉ. पी. विठ्ठल, डॉ. नागोराव कुंभार

Sarvadarshi Dr. Babasaheb Ambedkar
Sampadak : Dr. P. Vitthal, Dr. Nagorao Kumbhar

■

प्रथम आवृत्ती : १७ सप्टेंबर, २०१६ (विद्यापीठ वर्धापन दिन)

■

ISBN : 978-81-8483-697-4

■

© मा. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड-४३१ ६०६.

■

मुखपृष्ठ : शाम भालेकर

■

अक्षरजुळणी : डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

■

मुद्रक : रेप्रो नॉलेज कास्ट लिमिटेड, मुंबई

■

प्रकाशक
डायमंड पब्लिकेशन्स
२६४/३ शनिवार पेठ, ३०२ अनुग्रह अपार्टमेंट
ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे-४११ ०३०
☎ ०२०-२४४५२३८७, २४४६६६४२
info@diamondbookspune.com

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी भेट द्या
www.diamondbookspune.com

■

मूल्य : २००/-

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी-फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

# संपादकीय

एक महान तत्त्वचिंतक, बुद्धिप्रामाण्यवादी नेते आणि लोकशाही मूल्यांचा पुरस्कार करणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे युगपुरुष अशी जगभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख आहे. समग्र आयुष्यभर त्यांनी जोपासलेली तत्त्वनिष्ठा आणि भारतीय समाजक्रांतीप्रती त्यांनी बाळगलेली प्रतारणाविहीन कार्यनिष्ठा ही त्यांच्या महापरिनिर्वाणापश्चातच्या अनेक राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक चळवळींना प्रेरणास्वरूप राहिली आहे. धर्म, समाज आणि संस्कृतीची कठोर आणि तर्कनिष्ठ चिकित्सा करून त्यांनी भारतीय समाजजीवनातल्या प्रतिगामी रूढी-परंपरांना, विषमता आणि शोषणाला विरोध करून समतेचे तत्त्व रुजविण्याचा प्रयत्न केला. भारताला लोकशाहीवादी देश करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान अभूतपूर्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समग्र आयुष्यभर केलेल्या कार्यामुळे सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली. चातुर्वर्ण्यावर आधारित विषमतापूर्ण व्यवस्थेचे उच्चाटन झाले आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे एका विशिष्ट वर्गाचे वर्चस्व संपुष्टात येऊन सर्वसामान्यांना समान हक्क मिळाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय उपखंडातील शोषितांच्या समग्र मुक्तिसाठी अखंडपणे ज्ञानसाधना केली. प्रत्यक्ष राजकीय, सामाजिक चळवळीची कास न सोडता या चळवळीला पोषक अशी वैचारिक ज्ञानसंपदा निर्माण करणारे ते भारतीय राजकारणातील अपवादात्मक उदाहरण आहे. त्यांनी समताधिष्ठित जातीविहीन समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहिले. त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आज अनेक दशकांनंतरही महत्त्वाचा वाटतो आहे.

विशेषतः वर्तमान काळ हा अधिकाधिक जटिल आणि वैचारिकदृष्ट्या गुंतागुंतीचा आहे. आपापल्या जाती आणि धर्माच्या चक्रात अडकून प्रत्येक महामानवाकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिक दिसतो आहे. असे असतानाही डॉ. आंबेडकरांच्या विचारांना टाळता येत नाही अथवा त्यांना कालबाह्य ठरवता येत नाही. कारण डॉ. आंबेडकरांनी उच्चवर्णियांना जातीची अहंता सोडायला भाग पाडले आणि दलित व मागास समाजाचे समग्र मानसिक परिवर्तन करून त्यांना

# अनुक्रम


• संपादकीय — तीन

**विभाग–अ**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूल्यदृष्टी**

१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्म संकल्पना आणि धर्मांतर — ३
डॉ. जनार्दन वाघमारे

२ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्ध आणि त्यांचा धम्म — १५
डॉ. रावसाहेब कसबे

३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धम्मविषयक तत्त्वज्ञान — ५२
प्रा. डॉ. ज. रा. दाभोळे

४ डॉ. आंबेडकर यांचा सामाजिक मूल्यविषयक दृष्टिकोन — ६४
प्रा. सुहास पळशीकर

५ डॉ. आंबेडकरांची स्वातंत्र्याची संकल्पना — ७७
प्रा. जयदेव डोळे

६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाही संकल्पना — ८६
श्री. बी. व्ही. जोंधळे

७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक लोकशाहीची संकल्पना — ९३
श्री. मोतीराम कटारे

८ राजकारण, धर्म आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर — १२५
प्रा. राजीव आरके

९ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रजासत्ताक राष्ट्रवाद — १४०
प्रा. डॉ. सिद्धोधन

**विभाग–ब**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारविश्व**

१० डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा शैक्षणिक संदर्भ — १५१
डॉ. पंडित विद्यासागर

११ डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार — १५९
डॉ. नागोराव कुंभार

१२ कामगारांचे प्रश्न आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर — १६५
डॉ. गंगाधर पानतावणे

१३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चळवळीविषयक विचार — १७२
श्री. ज. वि. पवार

१४ जागतिकीकरण व आंबेडकरप्रणीत दलितांचा मुक्तीप्रपंच — १७७
डॉ. आनंद तेलतुंबडे

१५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांती–प्रतिक्रांतीचे वास्तव — १९१
डॉ. संजय मून

१६ जातिव्यवस्थेचे राजकीय अर्थशास्त्र : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान — २०६
प्रा. सचिन गरुड

१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेतीविषयक विचारांची वर्तमान उपयुक्तता — २१९
प्रा. डॉ. पी. एस. कांबळे

१८ आंबेडकरी विचारधारा आणि आदिवासी क्रांतिवाङ्मय — २२८
डॉ. वैजनाथ अनमुलवाड

**विभाग–क**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य**

१९ अतुलनीय... अद्भुत.... — २४५
डॉ. नरेंद्र जाधव

२० वेटिंग फॉर व्हिसा : डॉ. बाबासाहेबांचे आत्मकथन — २५१
प्रा. अविनाश डोळस

२१ राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर — २६१
डॉ. प्रकाश मोगले

२२ डॉ. आंबेडकर व हिंदू कोड बिल : एक पुनर्दृष्टिक्षेप — २६८
डॉ. संगीता ठोसर

२३ हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम व डॉ. बाबासाहेब आंबेडकर — २७२
प्रा. डॉ. प्रकाश संभाजी वाघमारे

२४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर : विद्रोही-सर्जनशील संस्कृतीचा महान आदर्श — २७८
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे

२५ सर्वदर्शी आंबेडकर (कविता) — २८८
पी. विठ्ठल
(शतकोत्तरी रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विनम्र अभिवादन)

• विद्यापीठ गीत — २९२


## सर्वदर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर



### ।। विभाग-अ ।।

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूल्यदृष्टी

# २४

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर : विद्रोही–सर्जनशील संस्कृतीचा महान आदर्श

■

डॉ. राजेश्वर दुडूकनाळे

### प्रास्ताविक

सत्य-असत्य, समता-विषमता, स्वातंत्र्य-गुलामी यांच्यातील लढाई प्रकाश आणि अंधार यांच्या लढाईइतकीच जुनी आहे. अर्थातच, प्राचीन काळापासून समाजामध्ये सत्तासंघर्ष चालू असलेला दिसून येतो. या सत्तासंघर्षामधूनच समाजजीवनात विषमता, गुलामी निर्माण होते. स्वत:चे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी, स्वार्थासाठी समाजातील एक विशिष्ट वर्ग बहुसंख्य लोकांवर अन्याय-अत्याचार करीत असतो. या वर्गाकडूनच माणसाच्या मेंदूला गुलाम बनविण्यासाठी एक शोषणाधिष्ठित व्यवस्था निर्माण केली जाते. अशा व्यवस्थेचा भाग किंवा घटक असणारा माणूस एक तर 'शोषक' असतो नाही तर 'शोषित' असतो. शोषकांनी निर्माण केलेल्या व्यवस्थेमध्ये बहुसंख्य माणसांचे बौद्धिक, भावनिक, धार्मिक, वैचारिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा अनेक पातळ्यांवर शोषण सुरू असते. अर्थातच, शोषित वर्ग जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मागासलेला असतो आणि शोषक वर्ग पुढारलेला, निर्ढावलेला, मुजोर बनलेला असतो. समाजजीवनातील या दोन वर्गांमध्ये चालणारा संघर्ष समाजाच्या अस्तित्वाइतकाच जुना आहे. या संघर्षामध्ये, समाजजीवनाच्या इतिहासामध्ये 'विद्रोह' या मूल्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुभाव, सौजन्य, सत्यनिष्ठा, सौंदर्य, विवेकनिष्ठा ही विविध प्रकारची मूल्ये मानवी जीवनाला उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जातात. या मानवी जीवनाला उन्नत करणाऱ्या मूल्यांचे मूळ मात्र विद्रोहामध्ये असते. या अर्थाने



राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'विद्रोहात्मक' जीवनसंघर्षातून समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता ही जीवनमूल्ये विकसित झाली आहेत.

### विद्रोहाचा अर्थ

कोणत्याही समाजात आणि कोणत्याही काळामध्ये माणसासमोर जगण्याचे प्रमुख असे दोन मार्ग असतात. एक म्हणजे परंपरेने चालत आलेले जीवन सर्वांगाने स्वीकारणे. स्वत:च्या वाट्याला आलेले जीवन आपल्या दैवाचा भाग समजणे, हा होय. या मार्गामध्ये माणूस गुलामीलाही धर्म, संस्कृती समजतो. अशा प्रकारचे जीवन चाकोरीबद्ध, परंपरागत विचारांवर आधारलेले असते. म्हणून या मार्गात संघर्षाचा संबंधच येत नाही. जीवनाचा दुसरा मार्ग यापेक्षा संघर्षमय, रोमांचकारी आहे. तो म्हणजे परंपरेने चालत आलेले जीवन सर्वांगाने 'जसेच्या तसे' न स्वीकारता त्या जीवनमार्गातील अन्यायकारक, शोषक गोष्टींना विरोध करणे आणि संपूर्ण मानवजातीला हितकारक ठरणाऱ्या चांगल्या गोष्टींचा स्वीकार करणे हा होय. या मार्गाने जो माणूस, जो समाज प्रवास करण्याचा प्रयत्न करतो त्या माणसाची, समाजाची प्रगती होऊ शकते. जीवन मार्गाच्या या दुसऱ्या वाटेवर जाणीवपूर्वक टाकलेले पहिले पाऊस म्हणजे 'विद्रोहा'चे बीजारोपण होय. प्रचंड अशा काळोखाच्या विरुद्ध दिशेने पडलेला सूर्याचा पहिला किरण होय.

'विद्रोह' या शब्दाचा अर्थ शब्दकोशामध्ये 'अनिष्ट परंपरेविरुद्ध उठाव' किंवा 'निषेध' असा दिला आहे.[१] 'विद्रोह' म्हणजे कशाचा तरी निषेध करणे किंवा एखादी गोष्ट नाकारणे असा सर्वसाधारण समज आहे. विद्रोहाच्या प्रक्रियेमध्ये नकार, निषेध असतो हे जरी खरे असले तरी केवळ नकार म्हणजे विद्रोह नव्हे! 'विद्रोहा'मध्ये नकाराबरोबरच स्वीकाराची प्रक्रियाही महत्त्वाची असते. अर्थातच, वाईटाचा नकार आणि चांगल्याचा स्वीकार हे 'विद्रोहा'चे मुख्य सूत्र असते. विद्रोहाचा अर्थ सांगताना डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, " 'विद्रोह' म्हणजे प्रस्थापितांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी वंचितांनी केलेले सर्वांगीण स्वातंत्र्ययुद्ध होय. विद्रोह म्हणजे आपल्या श्वासोच्छ्वासांवरची, आपल्या नाडीच्या ठोक्यांवरची, आपल्या स्वत्वावरची, किंबहुना आपल्या एकूण अस्तित्वावरचीच अनिष्ट बंधने तोडणे, आपल्याला गुदमरवून टाकणारी दडपणे झुगारून देणे होय. असा विद्रोह करताना काहीसा कर्कश आवाज, काही मोडतोड, काही विध्वंस होणारच. पण एवढ्यावरून विद्रोह म्हणजे काही तरी अनिष्ट अशी केवळ नकारात्मक संकल्पना आहे, असे मात्र कोणी म्हणू नये."[२] यावरून

विद्रोह केवळ नकारात्मक नसतो हे लक्षात येते. केवळ नकारातून नवी संस्कृती निर्माण होऊ शकत नाही, याचे भान ठेवूनच विद्रोहात्मक संघर्ष चालू राहतो. 'विद्रोह' संकल्पनेच्या संदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ''साधारणतः आपल्याला दिसते की, नैसर्गिक न्याय आणि व्यवस्था यांच्यामधल्या संघर्षाला आपणाला 'विद्रोह' असे म्हणता येईल. कारण विद्रोह करायचा तो कशाशी करायचा किंवा कोणाशी करायचा हा महत्त्वाचा प्रश्न असतो. जी काही एक व्यवस्था निर्माण झालेली असते, त्या व्यवस्थेशी हा विद्रोह केला जातो.''[३] माणसाचे नैसर्गिक हक्क-अधिकार ज्या व्यवस्थेमध्ये हिरावून घेतलेले असतात, त्या व्यवस्थेच्या विरोधामध्ये विद्रोह करावा लागतो.

विद्रोहाच्या संस्कृतीमध्ये द्वेष, विश्वासघात बसत नाही. माणसा-माणसामध्ये जिव्हाळ्याचे, प्रेमाचे संबंध निर्माण करणे, मानवतावादी मूल्ये रुजविणे, जात, धर्म, पंथ, लिंग, भाषा इत्यादींच्या पलीकडे जाऊन माणसा-माणसाचे केवळ 'माणूस' म्हणून अतूट नाते निर्माण करणे हे विद्रोही संस्कृतीचे अंतिम ध्येय आहे.

विद्रोहाची संकल्पना समजून घेत असताना शोषक आणि शोषित यांच्यातील संघर्षही विचारात घ्यावा लागतो. कारण या संघर्षातूनच विद्रोहाचा जन्म होत असतो. प्रत्येक काळात, प्रत्येक समाजव्यवस्थेत शोषकांकडून सामान्य लोकांचे शोषण चालू असते. शोषित वर्ग गुलामी झुगारून टेण्याचा जेव्हा प्रयत्न करतो तेव्हा खऱ्या अर्थाने संघर्षाला सुरुवात होते. एका अर्थाने शोषितांचा संघर्ष हा त्यांच्या हितासाठी जसा असतो तसा शोषकांना सुधारण्यासाठी, स्वतःमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी दिलेली ती एक संधीही असते.

व्यक्तीकडून किंवा समाजाकडून केला जाणारा विद्रोह हा एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या, जातीच्या, वर्णाच्या, धर्माच्या किंवा वर्गाच्या विरोधात नसतो. प्रतिगामी प्रवृत्तीच्या विरोधामध्ये हा विद्रोह चालू असतो. वाईट गोष्टींचा प्रतिकार जसा विद्रोहामध्ये असतो तसा स्वत्वाचा शोधही असतो. 'माणूस' म्हणून असणारे स्वतःचे अस्तित्व अधिकाधिक न्यायमूल्यांच्या आधारे विकसित करणे, हीदेखील विद्रोहाच्या मागची प्रेरणा असते. यासंदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, ''दलित लेखकांचा विद्रोह विशिष्ट व्यक्तींविरुद्ध वा विशिष्ट जमातीविरुद्ध नाही तर हा विद्रोह, ही बंडखोरी स्वत्व शोधासाठी आहे. प्रतिगामी प्रवृत्ती आणि कालबाह्य जीवनादर्श यांच्याविरुद्ध हा विद्रोह सतत चालू राहणार.''[४] समाजातील प्रस्थापित वर्गाचे आदर्श विस्थापित वर्गाचे आदर्श होऊ शकत नाहीत. कारण शोषणाला पोषक असणारे आदर्शच शोषित वर्गावर लादले जातात. मग ते कालबाह्य असोत किंवा विकृत असोत, असे आदर्श प्रस्थापितांच्या व्यवस्थेला बळकटी आणण्याचे काम करतात. अशा आदर्शांना मोडीत काढण्याचे काम विद्रोह करणाऱ्या व्यक्तीला किंवा समूहाला करावे लागते. एकूणच, विद्रोह हा जात, पंथ, धर्म, लिंग, वर्णाच्या भिंती ओलांडून विशाल अशा मानवतावादाच्या प्रदेशात प्रवेश करणारा असतो.

### विद्रोह आणि नवनिर्मिती

विद्रोही जाणिवेचा आणि सर्जनाचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. कारण विद्रोहानंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे नवनिर्माण होय. हे नवनिर्माण गुलामीच्या बेड्या तोडणारे आणि माणसांना जोडणारे असते. या संदर्भात डॉ. आ. ह. साळुंखे लिहितात, ''विद्रोह म्हणजेच 'सर्जन' किंवा विद्रोहामुळे आपोआपच नवनिर्मिती होते, असे मी म्हणत नाही. कारण, विद्रोहाद्वारे गुलामगिरीची बंधने तोडल्यानंतरही शहाणपणाने अपार कष्ट केल्याशिवाय निर्दोष अशी नवी व्यवस्था निर्माण होत नाही, असे मी मानतो. तरीदेखील नवी व्यवस्था निर्माण करण्याच्या वाटेतील अडथळे विद्रोहामुळे दूर होतात, हे विसरता येत नाही. याचा अर्थ असा की, विद्रोहाच्या उदरातच सर्जनाचे बीज रुजत असते. विद्रोह हेच विकासाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल असते. निदान आपल्या समाजाच्या बाबतीत तरी हे वस्तुनिष्ठ सत्य आहे.''[५] विद्रोहाचे अंतिम ध्येय हे नवसमाजनिर्मिती असते. भारतीय समाजाचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास विचारात घेता अशा विद्रोहात्मक सर्जनातूनच आजची लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आल्याचे आढळून येते. म्हणून विद्रोहाच्या उदरातच सर्जनाची, नवनिर्मितीची बीजे असतात, असे म्हटले जाते. केवळ चीड, नकार व्यक्त करून चालणार नाही तर त्यापुढे जाऊन एक विधायक पर्याय द्यावा लागतो. सकारात्मक भूमिकेतून नवी शोषणमुक्त व्यवस्था निर्माण करावी लागते. म्हणून विद्रोहाच्या प्रक्रियेमध्ये नवनिर्मितीला अत्यंत महत्त्व आहे.

विद्रोहातून अस्तित्वात येणाऱ्या समाज व्यवस्थेमध्ये माणूस मानसिक दृष्ट्या स्वतंत्र असतो. तो निर्भय असतो. असा माणूस कोणाचा गुलामही असत नाही आणि उद्दामही असत नाही. तो कोणाचा अन्याय सहन करत नाही आणि तो दुसऱ्यावर अन्याय करत नाही. अशा विद्रोहात्मक सर्जनामध्ये सर्वांना उमलण्याची, फुलण्याची समान संधी असते. प्रत्येकाला माणूस म्हणून जगण्याचा आणि स्वतःची प्रगती करण्याचा हक्क-अधिकार असतो.

### 'विद्रोह' संकल्पनेचा उदय आणि विकास

समाजसंघर्षाच्या इतिहासाइतका विद्रोह संकल्पनेचा इतिहास जुना आहे. कारण

अर्थातच, विद्रोहाची मुळे प्राचीन काळापासून चालत आलेल्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक संघर्षामध्ये दडलेली आहेत.

जगाच्या पाठीवर उद्योगाच्या क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे मानवाच्या आधुनिक जीवनाला सुरुवात झाली. शिक्षणाच्या, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सामाजिक-धार्मिक आणि सांस्कृतिक संघर्षाला नवी वळणे प्राप्त झाली. यातूनच पाश्चात्य देशांमध्ये अठराव्या शतकात 'विद्रोहा'च्या संकल्पनेचा जन्म झाला. यासंदर्भात प्रा. रा. ग. जाधव यांनी म्हटले आहे, ''विद्रोहाची संकल्पना आधुनिक आहे. पश्चिमी देशांत अठराव्या शतकापासून म्हणजे औद्योगिक समाजाच्या उदयानंतरच 'प्रोटेस्ट'ची किंवा निषेधाची वा विद्रोहाची संकल्पना प्रचलित झाल्याचे दिसते. हे विसावे शतक तर विद्रोहाचेच शतक मानले जाते. अमेरिकेतील निग्रो समाज, ऱ्होडेशियातील आफ्रिकी समाज, ऑस्ट्रेलियातील आदिवासी समाज आणि भारतातील आजवर अस्पृश्य मानला गेलेला समाज हे सर्व विद्रोही विचारप्रणालीने पेटलेले समाज आहेत.''[६] अर्थात, आधुनिक काळाच्या पार्श्वभूमीवरच हे मत लक्षात घ्यावे लागते.

भारताचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास हा क्रांती-प्रतिक्रांतीचा आहे. आर्यांच्या आक्रमणानंतर वैदिक समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था अस्तित्वात आली होती. चार वर्णांमध्ये समाजाची विभागणी करून माणसा-माणसात भेदभाव करण्यास सुरुवात झाली होती. समाजातील विशिष्ट वर्गाकडे सर्व अधिकार देऊन बहुसंख्य लोकांना त्यांच्या न्याय-हक्क-अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले होते. अशा शोषण व्यवस्थेला चार्वाक, बुद्धांसारख्या महामानवांनी आव्हान देऊन विद्रोह पुकारला. अर्थातच, भारतीय समाजातील विद्रोहाची परंपरा प्राचीन काळापासून विकसित होत आली आहे.

आधुनिक भारतीय समाजामध्ये इंग्रजी साम्राज्याच्या आगमनानंतर अनेक क्षेत्रांत परिवर्तने होऊ लागली. इंग्रजी शिक्षणाच्या संपर्कामुळे भारतीय समाजमनाला एक नवे भान आले. नवी दृष्टी आली. याचा परिणाम म्हणून एकोणिसाव्या शतकात समाजप्रबोधनाला प्रारंभ झाला. शिक्षणाच्या प्रचार-प्रसारामुळे आणि समाजसुधारकांच्या प्रबोधनात्मक कार्यामुळे विद्रोही चळवळीला पोषक असणारे वातावरण निर्माण झाले होते. म. जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कृतीतून भारतीय समाजाला एक नवे आत्मभान आले. अर्थातच, या महापुरुषांच्या कार्यातूनच आधुनिक भारताच्या इतिहासात 'विद्रोह' संकल्पनेचा, 'विद्रोही' चळवळीचा विकास झालेला दिसून येतो.





भारतीय समाजात हजारो वर्षांपासून सामाजिक विषमता अस्तित्वात आहे. वैदिक धर्मव्यवस्थेमुळे सुरुवातीला समाजात चार वर्ण अस्तित्वात आले. पुष्यमित्र शुंगाच्या काळात मनुस्मृतीच्या रचनेनंतर समाजात जातीयता आणि अस्पृश्यता निर्माण झाली. वर्णाच्या आणि जातीच्या आधारे माणसाची गुणवत्ता ठरवली जाऊ लागली. परिणामी, भारतीय समाजात पराकोटीची सामाजिक विषमता निर्माण झाली. या सामाजिक विषमतेच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बंड पुकारले. तथागत गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा जोतीराव फुले यांना गुरू, प्रेरणास्थान मानून त्यांनी वैदिक धर्म व्यवस्थेच्या विरुद्ध विद्रोह पुकारला.

डॉ. बाबासाहेबांचे जीवन म्हणजे विद्रोही जाणिवांचा उत्कट आविष्कारच! आंबेडकरांचे दुसरे नावच संघर्ष! हजारो वर्षांपासून ज्यांचे माणूसपण नाकारण्यात आले, ज्यांना स्वातंत्र्यापासून, हक्क-अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले अशा शोषितांना न्याय देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी हा संघर्ष केला. ''गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल.'' हे डॉ. आंबेडकरांचे विधान म्हणजे गुलामीच्या अंधाराला, व्यवस्थेला उद्ध्वस्त करणारे क्षेपणास्त्रच होय. डॉ. आंबेडकरांच्या या संघर्षातून शोषित माणसाला जगण्याचे बळ मिळाले. जीवनाचा नवा मार्ग सापडला. म्हणून डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा एक विजेचा कल्लोळच. त्यांचे जीवन म्हणजे दीप्तिमान प्रकाश. अखंड स्रवणारा. मूकांना वाचा देणारा. पांगळ्यांना पर्वत चढण्याचे सामर्थ्य देणारा. सामर्थ्यहीनांना सामर्थ्याचे भक्कम बाहू देणारा. इच्छाशक्तींचा अंगार उसळविणारा. दलितांनी शासनकर्ती जमात व्हावी म्हणून अहर्निश झटणारा. 'फेकून दिलेला भाकरीचा तुकडा आम्हाला नको, आम्हाला हवे स्वाभिमानाचे जिणे' असे तडफेने सांगणारा हा झंझावात, दलितांच्या जीवनाला झपाटून टाकण्यासाठी आला.''[७] शोषित वर्गाला अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लढण्यासाठी डॉ. आंबेडकर नेहमी प्रेरणा देत असत. अस्पृश्यांना दिलेल्या एका संदेशामध्ये ते म्हणतात, ''ज्या लोकांमध्ये आपला जन्म झाला त्यांचा उद्धार करणे आपले कर्तव्य आहे अशी ज्यांना जाणीव आहे ते धन्य होत. गुलामगिरीवर हल्ला चढविण्यासाठी जे आपले तन, मन, धन आणि तारुण्य कुरबान करतात ते धन्य होत! आणि अस्पृश्यांना आपली माणुसकी पूर्णपणे मिळेपर्यंत जे बऱ्याची-वाईटाची, सुखाची-दुःखाची, संकटांची-वादळांची, मानाची-अपमानाची पर्वा न करता एकसारखे झगडत राहतील ते धन्य होत.''[८] अशा संदेशामुळेच शोषित वर्गाला आत्मभान आले. तो सामाजिक अन्यायाच्या विरोधात संघटित होऊन संघर्ष करू लागला.

आत्मभानामुळे गुलामीत जगणारा माणूस आपल्या हक्क, अधिकाराबद्दल जागृत होतो. आत्मभानातून येणारे आत्मतेज माणसात आत्मविश्वास निर्माण करते. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत अत्यंत महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, ''आत्मतेज उत्पन्न होण्यास ज्याने त्याने आपल्या जीविताची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली पाहिजे. आलेल्या परिस्थितीशी झगडले पाहिजे. आपल्या बलाची, बुद्धीची व कर्तृत्वशक्तीची पराकाष्ठा केली पाहिजे. सर्वत्र चाललेल्या जीवनकलहात दंड थोपटून उभे राहिले पाहिजे. आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या मनगटाशी मनगट घासून होईल तितके यश संपादन केले पाहिजे. त्याशिवाय मनुष्यमात्र स्वतंत्र होऊन दुसऱ्याच्या आदरास कधीच पात्र होणार नाही.''[९] या विवेचनावरून आत्मभानाचे महत्त्व लक्षात येते. अर्थातच, आत्मभान, आत्मतेज प्राप्त होणे म्हणजे माणसाच्या मनात विद्रोही जाणीव निर्माण होणे होय.

''हिंदू म्हणून जन्माला आलो; तरी हिंदू म्हणून मरणार नाही.'' ही घोषणा डॉ. आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ला खरी करून दाखविली. विषमतेवर, शोषणावर आधारलेल्या वैदिक धर्माला म्हणजेच हिंदू धर्माला नाकारून समताप्रिय, विवेकवादी बौद्ध धर्माचा जाहीरपणे स्वीकार केला. डॉ. आंबेडकरांचा हा 'नकार' आणि 'स्वीकार' म्हणजे भारताच्या सामाजिक, धार्मिक इतिहासातील मोठी क्रांतीच होती. आंबेडकरांच्या या विद्रोहाबद्दल डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''चौदा ऑक्टोबर म्हणजे अंधाराला चिरत जाणारा प्रकाश. चौदा ऑक्टोबर म्हणजे नवे जीवनगाणे. चौदा ऑक्टोबर म्हणजे मानवतावादाने दिलेली हाक. नव्या निर्मितीचा उधाणक्षण म्हणजे चौदा ऑक्टोबर. या दिवसाची प्रतीक्षा करीत अस्पृश्यांच्या हजारो पिढ्या बर्बाद झाल्या–बेचिराख झाल्या.''[१०] डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची ही कृती म्हणजे विकृतीचा धिक्कार आणि संस्कृतीचा स्वीकार होय. मानवतावादाचा आविष्कार होय.

स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभाव या मूल्यांवर आधारलेली लोकशाही प्रस्थापित करणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनसंघर्षाचे ध्येय होते. अर्थातच, डॉ. आंबेडकरांनी केलेल्या विद्रोहाचे मधुर फळ म्हणजे 'भारतीय राज्यघटना' होय. लोकशाहीचा आधारस्तंभ असलेली राज्यघटना प्रत्येकाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क देते. व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करते. डॉ. आंबेडकरांनी आपल्या तत्त्वज्ञानामध्ये 'स्वातंत्र्य' या मूल्याला खूप महत्त्व दिले आहे. यासंदर्भात डॉ. जनार्दन वाघमारे म्हणतात, ''लोकशाही समाजव्यवस्थेचा प्राणबिंदू म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूल्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. 'एक व्यक्ती, एक मूल्य' हे सूत्र आमच्या हाती दिले.''[११] खरे तर माणसाच्या जीवनात स्वातंत्र्यापेक्षा श्रेष्ठ दुसरे काही असूच शकत नाही. स्वातंत्र्य म्हणजे संपूर्ण मानवजातीला उन्नत करणारे मूल्य होय. या मूल्याला केंद्रबिंदू मानूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समृद्ध अशा लोकशाहीचा विचार भारतीयांना दिला.

विद्रोही जाणिवेमध्ये स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, बंधुभाव, मानवता या मूल्यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. विद्रोही जाणिवेचा आविष्कार म्हणजे ही जीवनमूल्ये होत. कारण स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, बंधुभाव, मानवता या मूल्यांवर आधारलेली शोषणमुक्त समाजव्यवस्था निर्माण करून प्रत्येकाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त करून देणे आवश्यक असते. विद्रोही मन संघर्षमय प्रवास करीत शेवटी या जीवनमूल्यांना आविष्कृत करते. यासंदर्भात प्रा. रा. ग. जाधव यांनी मांडलेले मत अतिशय महत्त्वाचे आहे. ते लिहितात, 'विद्रोह हा मराठी वाङ्मयीन सर्जनशीलतेचा एक स्थायी भाव आहे व त्याची विविध रंगरूपे मराठी वाङ्मयाच्या इतिहास–परंपरेत वेळोवेळी प्रकट झालेली आहेत. विद्रोहाचे आणि समता, बंधुता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय या लोकशाही मूल्यांच्या प्रतिष्ठापनेचे एक सर्जनशील तत्त्वज्ञान आधुनिक महाराष्ट्राला म. फुले, छत्रपती शाहू महाराज व डॉ. आंबेडकर या महामानवांनी दिले. या तत्त्वज्ञानाची ग्राह्यता व प्रस्तुतता उत्तरोत्तर अधिकाधिक तीव्रतेने आपणास जाणवत आहे. हे तत्त्वज्ञान ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर भारताचीच एक नवी सांस्कृतिक ओळख आहे व भारताच्या सर्वांगीण सांस्कृतिक जडणघडणीची नवी दिशाही आहे.''[१२] सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याची प्राप्ती करणे हे विद्रोही संस्कृतीचे ध्येय असते. सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, मानसिक, बौद्धिक स्वातंत्र्य प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही समाजाची सर्वांगीण प्रगती अशक्य आहे.

डॉ. आंबेडकरांच्या जीवनसंघर्षाला, मानवमुक्तीच्या लढ्याला सम्यक तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. त्यांचा लढा फक्त दलितवर्गापुरताच मर्यादित नव्हता. समाजातील प्रत्येक शोषित, उपेक्षित घटक हा त्यांच्या आंदोलनाचा अविभाज्य भाग होता. ''त्यांचा लढा केवळ जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी, अस्पृश्यांच्या उत्थानासाठी नव्हता तर मानवतेवर अन्याय करणाऱ्या सर्व अमानुष शक्तींच्या विरोधात होता. विषमताप्रधान समाजव्यवस्था नष्ट करून 'मानव तितुका एकच आहे.' या तत्त्वाची प्रस्थापना करणे हा त्यांचा जीवनोद्देश होता आणि म्हणूनच माणुसकीच्या प्राप्तीसाठी जगभर सुरू असलेल्या लढ्याचे बाबासाहेब आंबेडकर हे स्फूर्तिस्थान ठरते.''[१३] हे अरुण कांबळे यांचे मत डॉ. आंबेडकरांची व्यापक मानवतावादी भूमिकाच व्यक्त करणारे आहे.

विचारसूत्र आपल्या लक्षात येते. ते म्हणजे नकार-स्वीकार-सर्जनात्मकता आणि अंगीकार. प्रस्थापित व्यवस्थेला, त्यातील शोषणाला नकार, मानवतेला उन्नत करणाऱ्या, फुलवणाऱ्या जीवनमूल्यांचा स्वीकार. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि सामाजिक न्याय आदी मूल्यांना आविष्कृत करणारे सर्जनात्मक लेखन आणि अशा लेखनाला स्वतःच्या जगण्याचा व समाजाच्या अस्तित्वाचा अविभाज्य भाग बनविणारी, अंगीकार करणारी उच्च कोटीची नीतिमत्ता म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर! 'बुद्ध आणि त्यांचा धम्म', 'भारतीय राज्यघटना' ही बाबासाहेबांची नवनिर्मिती म्हणजे देशाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाला मांगल्याच्या, समतेच्या आणि स्वातंत्र्याच्या पायावर उभे करणारी महान कृती होय. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक काळातल्या विद्रोही-सर्जनशील संस्कृतीचे महान आदर्श ठरतात.

## संदर्भ


१) भावे ह. अ. (सं.) : 'वरदा मराठी शब्दकोश', वरदा प्रकाशन, पुणे, दु. आ.२००२, पृ. ३४३.

२) साळुंखे आ. ह. : 'संवाद सहृदय श्रोत्यांशी', लोकायत प्रकाशन, सातारा, प्र. आ. २००२, पृ. ११-१२.

३) तौर पृथ्वीराज (सं.) : 'साहित्य आणि विद्रोह', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००८, पृ. २६.

४) फडके भालचंद्र : 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९७७, पृ. ७०.

५) साळुंखे आ. ह. : 'संवाद सहृदय श्रोत्यांशी', उनि. पृ. १२.

६) जाधव रा. ग. : 'निळी पहाट', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, चौ. आ. १९९५, पृ. २२, २३.

७) पानतावणे गंगाधर : 'मूकनायक', निर्मल प्रकाशन, नांदेड, चौ. आ. १९९८, पृ. ५८, ५९.

८) कांबळे अरुण (सं.) : 'जनता पत्रातील लेख : डॉ. बाबासाहेब आंबेडकर', प्रतिमा प्रकाशन, पुणे, दु. आ. २००३, पृ. ४८.

९) मून वसंत (सं.) : 'डॉ. आंबेडकरांचे बहिष्कृत भारत व मूकनायक', महाराष्ट्र शासनचे मुंबई, प्र. आ. १९९०, पृ. ९९.

१०) पानतावणे गंगाधर : 'मूकनायक', उनि. पृ. ११.

११) वाघमारे जनार्दन : 'समाजपरिवर्तनाच्या दिशा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. १९९५, पृ. १०९.

१२) पारगावकर अरुण (सं.) : संमेलनाध्यक्ष रा. ग. जाधव, (अध्यक्षीय भाषण, ७७ वे अ. भा. म. सा. सं. औरंगाबाद, जानेवारी २००६), प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००४, पृ. २९५.

१३) कांबळे अरुण (सं.) : जनता पत्रातील लेख : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, उनि. पृ. ३४.


■ ■ ■